Shree Dnyanraj Mauli Shikshan Seva Mandal's
# ACHIEVERS COLLEGE
OF COMMERCE & MANAGEMENT (NIGHT COLLEGE), KALYAN
Affiliated to University of Mumbai    Recognised u/s 2(f) of the UGC Act, 1956
NAAC Accredited & ISO 9001:2015 Certified

**Ref. No. :- ADC/2024-25/340**    **Dated – 17/04/2025**

प्रति,
मा. सरचिटणीस,
सार्वजनिक वाचनालय,
कल्याण.

**विषय :— आपल्या वाचनालयासोबत विद्यार्थ्यांच्या विकासासाठी प्रयत्न करणेबाबत.**

मा. महोदय

अचिव्हर्स महाविद्यालय हे मुंबई विद्यापीठ मान्यता प्राप्त असून, कल्याण व सभोवतालच्या खेडयातील मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी उच्च शिक्षण देण्याचे काम गेली १२ वर्षापासून करीत आहे. संस्थेची सर्व भौतिक सुविधायुक्त अशी इमारत जोशीबाग, कल्याण (पश्चिम) येथे असून, शैक्षणिक पुस्तकांसाठी वाचनालय ही उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना इतर ही पुस्तके उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने आमचे महाविद्यालय आपल्या सार्वजनिक वाचनालयाशी घनिष्ठ संबंध प्रस्थापित करुन विद्यार्थ्यांचा ओघ वाचनाकडे आणण्याचा प्रयत्न करणार आहे. तरी खालील सुविधा आणि सहकार्यासाठी आपली मदत अपेक्षित आहे.

१) विद्यार्थ्यांना आपल्या वाचनालयातील विविध पुस्तके माफक फी आकारुन वाचनास देणे.
२) शिक्षकांना आपल्या वाचनालयातील सुविधा उपलब्ध करुन देणे.
३) वार्षिक वाचन प्रेरणा सप्ताह निमित्त आमच्या महाविद्यालयात विविध कार्यक्रम एकत्रितपणे राबविणे.
४) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना वाचनालयाकडे आकर्षित करण्याकरीता विविध योजना राबविणे.
५) उत्कृष्ट वाचक वार्षिक पुरस्कारासाठी सहकार्य करणे.

तरी उपरोक्त विषयांकित उद्दिष्टांची गरज लक्षात घेता, व्यापक दृष्टीने सहकार्य करावे ही विनंती.

धन्यवाद !

Recieved
Kalyankar
19/04/2025

ACHIEVERS COLLEGE OF COMMERCE & MANAGEMENT (NIGHT COLLEGE) ★ KALYAN (W)

आपला

डॉ. (सीए) महेश क. भिवंडीकर
प्राचार्य
Principal
Achievers College
Kalyan (W),

Add : Joshi Baug, Malhar Nagar, Santoshi Mata Mandir Road,
Kalyan (West) - 421 301 | Tel.: 9920892909 / 9167952909
E-mail : achieversraj@yahoo.co.in | Website : achieversccm.ac.in

Scanned with OKEN Scanner

स्थापना १८६४

# सार्वजनिक वाचनालय कल्याण

मुंबई विश्वस्त कायदा नोंदणी क्रमांक-ई ६ ठाणे

छत्रपती शिवाजी महाराज चौक, कल्याण (प.) • भ्रमणध्वनी : ९८१९९६०७५५/९८१९८६६३४७
E-mail : savak.kalyan@gmail.com Website : www.savak.in

सावाक २०२५-२६/३६

दिनांक :-२८/०४/२०२५

प्रति,
मा. डॉ. महेश क. भिवंडीकर
प्राचार्य, ॲचिव्हर्स कॉलेज,
कल्याण,
सस्नेह नमस्कार,

विषय:-वाचनालयासोबत विद्यार्थ्यांच्या विकासासाठी प्रयत्न करणे बाबत

संदर्भ क्र.२०२४-२५/३४०

महोदय,

उपरोक्त विषयानुसार आपले पत्र प्राप्त झाले. सार्वजनिक वाचनालय कल्याण या संस्थेत १६० वर्षांची अविरत वाचन परंपरा असून वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असतो. त्या अनुषंगाने **विद्यार्थी चालवितात वाचनालय, वाचनालय विद्यार्थ्यांच्या भेटीला, विद्यार्थी वाचनालयाच्या भेटीला, वाचक महोत्सव, पुस्तक महोत्सव, कथा -कविता लेखनस्पर्धा , वक्तृत्व स्पर्धा, शालेय विद्यार्थ्यांना सुट्टीच्या काळात मोफत वाचन सेवा** असे विविध उपक्रम आम्ही सातत्याने राबवित असतो.

आपण आपल्या पत्रात उल्लेख केल्याप्रमाणे आगामी काळात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वाचनालयाकडे आकर्षित करण्याकरिता विविध योजना आपल्या शैक्षणिक संस्थेसोबत राबविण्यास आमचे पूर्णतः सहकार्य राहील. सदर बाबतीत संबधित शिक्षकांसोबत एक बैठक आयोजित करून वार्षिक आराखडा तयार केल्यास आपले कार्य निश्चीतच अधिक सुलभ होईल.

आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद!

भिकू बारस्कर
सरचिटणिस
९३२४२७११४६

Scanned with OKEN Scanner